| MHRT050009162023 | दाखल तारीख | : | १६.१०.२०२३ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | १६.१०.२०२३ |
| | निकाल तारीख | : | १०.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०२ ०४ २५ |

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. एम. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.**

**(जाहीर दिनांक: १०.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५५५/२०२३**

(गु.र.क्र.२६२/२०२३ पोलीस ठाणे, खेड)

**निशाणी क्र.६ लगत**

**फिर्यादी** **महाराष्ट्र सरकार**
**पोलीस ठाणे, खेड**
ता.खेड, जि. रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** **सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.व्ही.जी.गायकवाड.**

**आरोपी** **अविनाश नारायण चव्हाण,**
वय – ५२ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा.बोरघर, ब्राम्हणवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ.**

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०३.०९.२०२३ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०३.०९.२०२३ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १६.१०.२०२३ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ०९.०१.२०२४ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १८.१२.२०२४ |
| निकालाची आरक्षीत तारीख | -- |
| निकालाची तारीख | १०.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अविनाश नारायण चव्हाण** | फौ.प्र.सं.क. ४१अ(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | -- | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निरंक |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १०.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता चालविण्यात आला.

**०२.** अभियोग पक्षाकडून दोन साक्षीदारांना तपासण्यात आले. त्यांच्या साक्षीतून आरोपीविरुद्ध दोषसिध्दीदर्शक पुरावे मिळून आल्याने आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ नुसार निवेदन (निशाणी ६ लगत) नोंदविण्यात आले.

**०३.** अभियोग पक्षाची हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, मी खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी त्या करिताचे कारणांसह विस्तृत करीत आहे.

| **अ.क्र.** | **विचारार्थ मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, | |

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | दि.०३.०९.२०२३ रोजी १८:३० वा.चे सुमारास बोरघर, ब्राम्हणवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे आरोपी हा त्याच्या ताब्यात ५ लि. मापाचा प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने भरलेला असा मुद्देमाल गैरकायदा बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळून आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**०४.** आरोपीविरुध्द निर्धारित केलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षीदाराच्या साक्षी पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

**०५.** मी अभियोग पक्षातर्फे सौ.व्ही.जी.गायकवाड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीकरिता विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांचा युक्तिवाद ऐकला.

**विचारार्थ मुद्दा क्र.१ करीता –**

**०६**. प्रस्तुत खटल्यामध्ये अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासले आहेत. पंच साक्षीदार दिपेश चव्हाण यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी केवळ पंचनाम्यावरील असलेली त्यांची स्वाक्षरी मान्य केली, परंतु त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे अभियोग पक्षाने सदर

साक्षीदाराला न्यायालयाच्या परवानगीने फितूर घोषित करुन सुचक प्रश्न विचारुन अभियोग पक्षाची हकिकत त्यांच्यासमोर मांडली, परंतु सदर साक्षीदाराने एकही बाब मान्य केली नाही. त्यामुळे अभियोग पक्ष सदर साक्षीदाराकडून घटनास्थळ पंचनामा सिध्द करु शकले नाही.

०७. साक्षीदार क्र.२ अलिमोद्दीन बदीयोद्दीन शेख यांच्या साक्षीनुसार दि.०३.०९.२०२३ रोजी बोरघर, ब्राम्हणवाडी येथे बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टी दारुची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन ते स्वतः तसेच पोलीस हवालदार डी.पी. गोरे/४७६, चालक नंदकुमार कांबळे व दोन पंच हे सदर ठिकाणी गेले. तेथे एका घराच्या मागील पडवीत एक इसम पांढऱ्या रंगाचा कॅन घेऊन बसलेला त्यांना दिसला. सदर इसमाने त्या कॅनमध्ये गावठी हातभट्टी दारु असल्याचे सांगितले. त्यानंतर त्या कॅनमधून प्रत्यंतरासाठी नमुना घेतला. त्यानंतर मिळून आलेला मुद्देमाल त्यांनी त्यांच्या ताब्यात घेतला व आरोपीला पोलीस स्टेशनला आणले. सदर साक्षीदाराने घटनेची फिर्याद दिली. अभियोग पक्षाने सदर साक्षीदारकडून फिर्याद (निशाणी ८) व प्रथम खबरी अहवाल (निशाणी ९) सिध्द करुन घेतला आहे. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराकडून आरोपीची ओळख पटवुन घेतली आहे. उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले आहे की, जप्त मुद्देमाल साक्षीच्या वेळी त्यांच्यासमक्ष हजर केलेला नाही,

०८. साक्षीदार क्र.१ यांनी अभियोग पक्षाच्या खटल्यास सहाय्यक ठरेल अशी कोणतीही बाब सांगितली नाही. सदर साक्षीदार यांनी केवळ पंचनाम्यावरील त्यांची स्वाक्षरी मान्य केली आहे, परंतु पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला हे त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे. अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द केला नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता त्यामध्ये न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा अहवाल दिसून येतो, परंतु तो अभियोग पक्षाने सिध्द केलेला नाही. अभियोग पक्ष समन्स काढूनही इतर साक्षीदारांना साक्ष कामी हजर करु शकले

नाही. तसेच पोलीसांनी कारवाई केल्यानंतर राखून ठेवलेला नमुना न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविला तोपर्यंत कोणाच्या ताब्यात होता व तो नमुना प्रयोगशाळेत कोणी जमा केला ह्या बाबी सिध्द झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत साक्षीदार क्र.२ यांची साक्ष आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबित करण्याइतपत पुरेशी ठरत नाही. सबब, मी विचारार्थ मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून विचारार्थ मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **अविनाश नारायण चव्हाण** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल यापुर्वी नाश केला नसल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर नाश करणेत यावा.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:53:37 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

भाग 'क'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | दिपेश जगन्नाथ चव्हाण | पंच साक्षीदार | ६ लगत |
| अ.सा.२ | अलिमोद्दीन बदीयोद्दीन शेख, पो.हवा. | फिर्यादी | ६ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | ८/अ.सा.क्र.२ | फिर्याद |
| २. | ९/अ.सा.क्र.२ | प्रथम खबरी अहवाल |

### ब. बचाव

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### मुद्देमाल

| **क्रमांक** | **मुद्देमाल वस्तू क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | ५ लि. मापाचा प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने भरलेला |
| २. | -- | एक प्लॅस्टीक मग |

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:53:44 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No.555/2023 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 10.03.2026 |